भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. २१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०१/२०१८

**१) पोस्ट ऑफीस मधील चिल्लर पैश्याची चोरी :-**

दिनांक १०+११/०१/२०१८ चे रात्र दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने पोस्ट ऑफीस हरदोलीचे छतावरील इंग्रजी कवेलु काढुन आत प्रवेश करुन लोखंडी टेबल चे कुलुप तोडुन ड्राप मध्ये ठेवलेल्या १००/-रु. च्या १२ नोटा व २००/-रु. चिल्लर असा एकुण १४,००/-रु. चोरुन नेल्याने फिर्यादी कु. अर्चना जनार्धन चौधरी रा. अत्री पो. स्टे अडयाळ (पोस्ट मास्टर हरदोली) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चनाब पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन वेगवेगळया ठिकाणातुन म.रा.वि.वि. कंपनीच्या डि.पी.ग्रीप चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ११/०१/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन वाहनी येथील डि. पी. मधील ७ ग्रीप किंमती ३,५००/-रु. व पिपरीचुन्नी येथील डि. पी. मधील ३ ग्रीप व ३ एच. आर. सी. फ्युज किंमती अंदाजे ३,६००/-रु. असा एकुण ७,१००/-रु. चा माल चोरी करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी राजु विठ्ठल सोनटक्के वय ३८ वर्ष, रा. सिहोरा वरीष्ठ तंत्रज्ञ म. रा. वि. वि. कंपनी सिहोरा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९,३४ भादवी. सहकलम १३६(अ) भा.वि.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) चारचाकी वाहनाच्या धडकेत एक जखमी . :-**

दिनांक ०१/०१/२०१८ चे १७.३० ते १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी राधेश्याम रमेश मरगडे वय ३२ वर्ष, रा. शहापुर ता+जि. भंडारा याने त्याची मोटार सायकल डिस्कवर क्र. एम.एच ३६ एच ५१७७ ने अडयाळ ते भंडारा राज्य महामार्ग क्र. २७१ ने डब्बल सिट जात असतांना मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चार चाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला खापा जंगल धडक देवुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांची कारवाई . :-**

दिनांक ११/०१/२०१८ चे १०.१२ वाजता. दरम्यान यातील तक्रारी अख्तर बेग अलीयार बेग मिर्झा यांना यातील आरोपी यांनी १०/०१/२०१८ रोजी चे पडताळणी कार्यवाही वेळी त्याचे डाव्या बाजुचे डोळयाचे मोतीया बिंदुचे ऑपरेशन सा. रु. भंडारा येथे करुन देण्याकरीता मागील ऑपरेशनचे १,०००/-रु. व आताचे करण्यात येणाऱ्या ऑपरेशन चे ५,०००/-रु. असे मिळुन ६,०००/-रु. लाचेची मागणी करुन तळजोडी अंती ४,०००/-रु. लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान ४,०००/-रु. लाच रक्कम स्विकारतांना रंगे हात पकडल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३(१)(ड),१३(२)ला. प्र. का.१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. नी. पारधी ए.सी. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक ११/०१/२०१८ चे १०.३०ते ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी ऑटो वाहन क्र. एमच ३६/३४७०च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन नवीन बसस्टॉप तुमसर येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ११/०१/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी ऑटो वाहन क्र. एमच ३५/२२९४ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन नवीन बसस्टॉप तुमसर येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**६) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ११/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी, वरठी, तुमसर, पालांदुर, व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर हातभट्टी दारू किंमती ३५५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३५५/–रु. असा एकुण ३,९०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.